# उत्क्रांती आणि जीवनमूल्ये

**हे जग कसे आहे, याचे उत्तर विज्ञान कदाचित देऊ शकेल; परंतु जगावे कसे हे ठरविण्याची बुद्धी आणि शक्ती मानवप्राण्याला प्राप्त आहे.**

**प्रदीप रावत**

'नथिंग इन बायॉलॉजी मेक्स सेन्स एक्सेप्ट इन द लाईट ऑफ इव्होल्युशन' - उत्क्रांतीशास्त्रज्ञ थिओडोसियस डोब्झान्स्की.

जीवसृष्टीच्या उत्क्रांतीबद्दलचा सिद्धान्त दीडशे वर्षांपूर्वी मांडला गेला. सर्व कसोट्यांवर तो पारखला गेला आहे. आज तो सिद्धान्त वैज्ञानिक सत्य या पदाला पोहोचला आहे. डॉ. डोब्झान्स्कीने म्हटल्यानुसार उत्क्रांतीच्या प्रकाशातच जीवसृष्टीचा अर्थबोध होऊ शकतो.

हा उत्क्रांतीचा सिद्धान्त आहे तरी काय?... एका आद्य पूर्वजातीपासून जीवसृष्टी अत्यंत कुर्मगतीने उत्क्रांत झाली आहे. या प्रदीर्घ कालावधीत जीवसृष्टीला असंख्य फाटे फुटले. उत्क्रांतीच्या अखंड वाटचालीतून नूतन व विभिन्न जातींचा उद्भव घडला व घडत असतो. ही उत्क्रांती साध्य करणारी यंत्रणा बहुतांशी नैसर्गिक निवड असते. ''नैसर्गिक निवडीद्वारा उत्क्रांती'' या वैज्ञानिक सिद्धान्ताने तोपर्यंत प्रचलित असलेल्या ''नैसर्गिक विश्वनिर्मातावाद'' या धार्मिक संकल्पनेची मक्तेदारी मोडून काढली. वैज्ञानिक कार्यपद्धतीद्वाराच आपल्या विश्वाचे आकलन होऊ शकते, असा दृष्टिकोन म्हणजे निसर्गवाद. सृष्टीतील भौतिक पदार्थ हेच सत्य आहे, हा दृष्टिकोन म्हणजे जडवाद. केवळ भौतिक पदार्थच नाही तर विचारशक्ती, इच्छाशक्ती, भावना यांसह अन्य सर्व काही या भौतिक सृष्टीचे घटक आहेत. सृष्टी व जीवसृष्टीचे आकलन केवळ भौतिक पदार्थ आणि त्यांचे गतिस्थिती नियम यांच्यातील परस्परसंबंधाच्या अभ्यासातून घडते. उत्क्रांतीचा आणि अखिल विज्ञानाचा संदेश ''नैसर्गिक जडवाद'' हा आहे.

उत्क्रांती म्हटली, की एक चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. चतुष्पाद माकडापासून आजच्या आधुनिक मानवापर्यंत निरनिराळ्या आदिमानवांची रांग असलेले ते सुपरिचित चित्र. दुर्दैवाने लोकांच्या मनात ठसलेले हे चित्र व त्यातून प्रकट होणारा संदेश दिशाभूल करणारे आहेत. उत्क्रांती म्हणजे विकास क्रम आणि मानव त्या विकासाचा सर्वोच्च बिंदू आहे; या दोन्ही धारणा अवैज्ञानिक आहेत. जीवसृष्टीच्या विराटवृक्षाला फुटलेल्या एका फांदीवर मानववंशाची डहाळी आहे. तसेच ह्या विराटवृक्षाच्या विस्ताराला कुठलीही दिशा नाही. याचे कारण उत्क्रांती ही हेतूपूर्वक, जाणीवपूर्वक किंवा बुद्धिपुरस्सर या शब्दांतून व्यक्त होणारी निर्मिती नाही.

सृष्टी आणि जीवसृष्टी यांच्या मूलतत्वांच्या ज्ञानासाठी आवश्यक अशी जिज्ञासू वृत्ती मानवापाशी आहे. प्रकृति आणि संस्कृतीचा असाधारण मिलाफ मानवात आढळतो. पण हाच मानव अनेक भ्रमांचे आगर आहे. माणूस आणि निसर्ग यात द्वैत आहे, हा सगळ्यात मोठा भ्रम तो जोपासतो. उत्क्रांतीचा माणसासाठी सर्वांत महत्त्वाचा संदेश हा आहे, की मनुष्यजात उर्वरित सर्व जीवसृष्टीशी नातेसंबंधाने जोडलेली आहे. जीवसृष्टीशी असलेली एकात्मता मान्य केली तर मानवाच्या असाधारणत्वाला बाधा येईल, अशी आपली भावना आहे. माणसातले काही उपजत व काही संस्कारित गुणधर्म हे त्याचे एकट्याचे संचित आहे, असे मानणे हा सुद्धा भ्रमच आहे. वात्सल्य, सहकार्य, स्वहिताबरोबरच सामूहिक हिताचा विचार करणे, एकनिष्ठ स्त्री-पुरुष संबंध, अपत्यांचे पालनपोषण, संरक्षण आणि संवर्धनासाठी आयुधांचा वापर, भूतकाळाची स्मृती, भविष्याचा वेध यांसारखी अनेक तथाकथित ''मानवी मूल्ये'' कमीअधिक प्रमाणात भवतालच्या जीवसृष्टीतसुद्धा आढळतात. त्यामुळे आपण उत्क्रांतीची सर्वश्रेष्ठ निर्मिती आहोत, या भ्रमाचा त्वरित त्याग करणे हे आपल्या हिताचे आहे.



**मनुष्यजात उर्वरित सर्व जीवसृष्टीशी नातेसंबंधाने जोडलेली आहे, हाच उत्क्रांतीचा संदेश आहे.**

**शुद्ध वंशाची भ्रामक कल्पना**

उत्क्रांतितत्वानुसार अन्य सजीवांप्रमाणे मानवजात सृष्टीच्या अंध व हेतूशून्य शक्तींचे काळाच्या सोबतीने जन्माला आलेले अपत्य आहे. उत्क्रांतितत्व आपल्याला सांगते, की पृथ्वीतलावरील अखिल मानवसमाज एकाच जातीचे सदस्य आहेत. माणसाच्या बाह्यरूपात जी भिन्नता आढळते, तिच्या आधारे माणसाचे मोल ठरवता येत नाही. वंशभेद, लिंगभेद आणि जातीभेद यांना कुठलाही वैज्ञानिक आधार नाही. गेल्या शतकातील सर्वांत मोठा वंशसंहार 'सुप्रजनन' या सत्याभासी, अशास्त्रीय विचारसरणीचा परिणाम होता. हिटलरच्या जर्मनीने वंशशुद्धीसाठी लाखोंचे बळी घेतले. अमेरिकेत वर्णसंकराला प्रतिबंध करणारे कठोर कायदे होते. दक्षिण आफ्रिकेत तर वर्णभेदावर आधारित राजकीय व्यवस्था होती. आपल्या समाजात खोलवर रुजलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि जातिजमातींची उतरंड यांचा उगम वंशशुद्धीच्या कल्पनेत आहे. त्यामुळेच श्रेष्ठ-हीन, स्पृश्य-अस्पृश्य या कल्पनांचा पगडा समाजावर आहे. गेल्याच वर्षी भारतातील जातीजमातींच्या सर्वेक्षणावरून सिद्ध झाले, की शुद्ध वंशाची जात ही भ्रामक कल्पना आहे. पूर्वजन्मातील गुणकर्मानुसार वर्तमान जीवनातील जात व भोग निर्धारित असतात, अशी आपली समजूत आहे. स्वर्ग-नरक, पाप-पुण्य, अठरा लक्ष योनींच्या चक्रातून सुटका करून घेण्यासाठी धडपडणारे आत्मे, मोक्षाचे परवाने राजरोस विकणाऱ्यांची दुकानदारी या सर्व बिनबुडाच्या भ्रामक कल्पना आहेत. शास्त्रीय अर्थाने अमरत्व हे जनुकांनाच बहाल करावे लागेल; कारण आद्यजीव ते वर्तमान सर्व सजीव त्या अखंडित जनुकप्रवाहातून जन्माला आलेले आहेत. स्त्री भृणहत्या, हुंडाबळी, बलात्कार, अस्पृश्यता यांसारखी दुष्कृत्ये आपल्या आनुवंशिक पशुवृत्तीची लक्षणे नाहीत. उत्क्रांतितत्व आपल्याला सांगते, की मुलगा होणे हे सर्वस्वी पुरुषावर अवलंबून असते, तरीदेखील स्त्रियांनाच जबाबदार धरले जाते. अज्ञानावर आधारित रुढी-परंपरांनी असे अत्याचार करण्याची 'नैतिक सोय' उपलब्ध करून दिली आहे. स्त्री आणि पुरुषांच्या लिंगभेदामुळे त्यांच्या शरीरक्रियाव्यवस्थेत वेगळेपणा निश्चितच आहे. पण त्याचा अर्थ स्त्री अबला आहे. पुरुषांपेक्षा कर्तृत्वाने हीन आहे. बुद्धीने सुमार आहे, हे सर्व दावे उत्क्रांतिवादी मानसशास्त्राने फोल ठरविले आहेत. स्त्री आणि पुरुष यांच्यातील मूल्यभेद जैविक नसून तो सांस्कृतिक आहे, याचे आकलन उत्क्रांतीच्या सिद्धान्तामुळे होते. जिथे जिथे स्त्रियांना स्वातंत्र्य मिळाले, तेथील स्त्रियांची कर्तबगारी याच वैज्ञानिक सत्याचा पुरावा आहे. कुटुंबव्यवस्थेचे स्थैर्य, अपत्यांचे पालनपोषण व आपल्या जोडीदाराप्रति एकनिष्ठ व्यवहार हे सर्व गुणधर्म स्त्रियांमध्ये अधिक प्रभावी असल्याचे उत्क्रांतिवादी मानसशास्त्राला आढळले आहे.

जीवसृष्टीची धारणा व उत्क्रांती ह्या भौतिक प्रक्रिया आहेत. या वैज्ञानिक सत्याचा स्वीकार केल्यास देववाद आणि दैववादाची भुरळ निश्चित दूर होईल. तसेच उत्क्रांतीबद्दलचे काही चुकीचे समज दुरुस्त होणे अत्यावश्यक आहेत. ग्रहांच्या कुंडलीवर आधारित नियतीवादाच्या जागी जनुककुंडलीवर आधारित नियतीवादाची प्रतिष्ठापना करणे ही अंधश्रद्धाच आहे. नैसर्गिक निवडीचे तत्त्व म्हणजे पराकोटीचा स्वार्थ आणि इतरांवर बळजोरी करण्याचा परवाना आहे, अशी सोईस्कर समजूत अनेकांची असते. वस्तुतः हे त्या तत्त्वाचे विकृतीकरण आहे. स्पर्धा आणि सहकार्य यांच्या अनोख्या मिश्रणातून ही जीवसृष्टी साकारलेली आहे. ज्या उत्क्रांतीने आपले शरीर घडविले तीच आपल्या वर्तनाचे मूलस्रोत आहे. पण सुदैवाने त्यात उपजत लवचिकता आहे. तीच आपल्या वर्तनस्वातंत्र्याचा आधार आहे. म्हणूनच आपल्या जीवनात अर्थ आणि आनंद, नैतिक मूल्ये आणि सौंदर्य निर्माण करण्याची जबाबदारी पूर्णतः आपली आहे. हे जग कसे आहे, याचे उत्तर विज्ञान देऊ शकेल. पण जगावे कसे हे ठरविण्याची बुद्धी-शक्ती मानवाकडे आहे.

**(लेखक जैविक उत्क्रांतीचे अभ्यासक आहेत.)**

**सोमवारच्या अंकात**

**दिल्ली वार्तापत्र**